**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

**दिनांक:- २६/०६/२०१८**

## मालेगावसह बाहेरील जिल्हयांमध्ये मोटरसायकल चोरी करणारे सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात, ०८ महागडया मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे आदेशान्वये जिल्हयातील मालाविरुध्दचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याची कारवाई सुरू आहे. जिल्हयातील वाढते चोरी, घरफोडी, मोटर सायकल चोरी तसेच गंभीर गुन्हयांतील सराईत गुन्हेगारांचा मागमुस काढुन गुन्हेगारीला प्रतिबंध करणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची धडक कारवाई चालु आहे. **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी जिल्हयातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेवुन त्यांचे सध्याचे ठावठिकाण व हालचालींबाबत सविस्तर माहिती घेणेबाबत स्थागुशाचे पथकास सुचना दिल्या आहे.

त्यानुसार दिनांक २५ जुन २०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी मालेगाव शहरात गस्त घालत असतांना, पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार काही इसम मालेगाव शहरात चोरी केलेल्या महागडया मोटर सायकल कमी किंमतीत विक्री करणार असल्याचे समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने मालेगाव कालीकूट्टी परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) इमरान खान लुकमान खान उर्फ इमरान लुक्क्या,** वय ३२, रा. चुनाभट्टी राजानगर, मालेगाव, **२) मोहम्मद एकलाख मोहमद शरिफ उर्फ एकलाख काल्या,** वय २२, रा. राहुलनगर, कालीकुट्टी मालेगाव यांना शिताफिने ताब्यात त्यांचे कब्जातुन एक विनानंबरप्लेटची सिल्व्हर रंगाची बुलेट ३५० सी.सी. मोटर सायकल जप्त करण्यात आली. सदर मोटर सायकलचे कागदपत्रांबाबत विचारपुस करता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने पोलीस खाक्या दाखविताच त्यांनी सदर मोटर सायकल मालेगाव कॅम्प भागातुन रात्रीचे वेळी चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपींना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचा **साथीदार नामे ३) शेख एकलाख शेख इकबाल उर्फ शाहरुख,** वय २३, रा. सर्व्हे नं.५६, नया इस्लामपुरा, मास्टर कॉलनी मालेगाव याचेसह विविध ठिकाणांवरून मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली आहे.

आरोपी शेख एकलाख शेख इकबाल उर्फ शाहरुख यास मालेगाव नया इस्लामपुरा परिसरातुन ताब्यात घेण्यात आले असुन त्याने त्याचे वरील साथीदारांसह **मालेगाव कॅम्प, रमजानपुरा, आयेशानगर, चांदवड, देवपुर धुळे, पुणे शहरातुन** मोटर सायकल चोरी केलेल्या असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन **०३ बुलेट ३५० सी.सी., ०२ बजाज पल्सर, ०१ हिरो सीडी डिलक्स, ०१ होण्डा युनिकॉर्न, ०१ होण्डा ॲक्टीव्हा मोपेड** अशा **एकुण ०८ मोटर सायकल किं.रू. ४ लाख ३७ हजार चा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांविरुध्द मालेगावसह इतर जिल्हयांमध्ये मोटर सायकल चोरी, घरफोडी, जबरी चोरी, चोरी असे **एकुण २३ गुन्हे दाखल असल्याचे** तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी हे सराईत असुन त्यांचे इतर साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

ताब्यात घेतलेले वरील तीनही आरोपीतांनी कबुली दिलेवरून **मालेगाव कॅम्प, रमजानपुरा, आयशानगर, चांदवड** पोलीस ठाण्यांसह धुळे जिल्हयातील **देवपुर पश्चिम पो.स्टे, व पुणे शहरातील कोंढवा** पोलीस ठाणेस दाखल असलेले **मोटर सायकल चोरीचे एकुण ०८ गुन्हे उघडकीस** आलेले आहे. जप्त करण्यात आलेल्या मोटर सायकल व आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **श्री. संदिप दुनगहु**, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.